ePaper पुणे लोकसभेसाठी लवकरात लवकर पोटनिवडणूक घ्या, मुंबई उच्च न्यायालयाचे निर्देश



| वर्ष - 7 | अंक - 216 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- प्रसिद्धची आफ्रिकेविरुद्ध हॅट्रीक!
- रामाच्या भूमिकेत झळकणार रणबीर
- पुढील 48 तासात पावसाची शक्यता!
- मला गोळी मारली जाईल!

www.mahaenews.com | गुरुवार, दिनांक 14 डिसेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# महापालिकेत 'टीडीआर' घोटाळा!

## विधानसभेत भ्रष्टाचाराचे आरोप : आयुक्तांसह अधिकाऱ्यांची भूमिका संशयास्पद!

**। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेतील डोळे पांढरे होतील, असा हजारो कोटींचा टीडीआर घोटाळा विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी नागपूर अधिवेशनात पुरवणी मागण्यांवर बोलताना चव्हाट्यावर आणला. सरकारची नियत साफ असेल तर त्यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधीतावर कारवाईची मागणीही त्यांनी केली आहे. या प्रकरणातील कादगोपत्री पुरावे सादर करताना महापालिका आयुक्तांसह दहा-बारा मोठे अधिकारी घरी जातील, अशीही शक्यता त्यांनी व्यक्त केल्याने प्रशासनात मोठी खळबळ आहे. विकासकाला मोठ्याप्रमाणात लाभ मिळावा यासाठी अनेक नियम, अटी, तरतुदी, कार्यपद्धतींचा विपर्यास करून अथवा गुंडाळून सदर प्रकरणाचे कामकाज सुरु आहे, असेही वडेट्टीवार यांनी निदर्शनास आणून दिले.**



अर्थ खात्याच्या पुरवणी मागण्यांवर बोलताना विजय वडेट्टीवार यांनी तब्बल दहा मिनिटे टीडीआर घोटाळ्यावरच भाष्य केले. ते म्हणाले, पिंपरी-चिंचवड महापालिकेतील मोठे घबाड हाती लागले आहे. कोट्यवधी रुपयांचा हा घोटाळा आहे. महापालिका विकास आरखड्यातील आरक्षित भूखंड खासगीत विकसीत करून घेण्याची तरतूद आहे. त्याचाच वापर करून सर्व नियम धाब्यावर बसवून हा घोटाळा झाला, असे वडेट्टीवार म्हणाले.

वाकड येथे महानगरपालिकेच्या विकास आराखड्यातील आरक्षण क्र. ४/३८ ट्रक टर्मिनस (काही भाग) आणि ४/३८ ए पीएमपीएमपीएल डेपोसाठी राखून ठेवले आहे. या भूखंडांचा विकास करताना एमिनीटी टीडीआर देताना हा मोठा घोटाळा झाला आहे. दोन्ही आरक्षणांचे मिळून १० हजार २७४ चौ.मी. क्षेत्र आहे. विकास आराखड्यातील समावेशक आरक्षणांच्या तरतुदींनुसार भूखंड मालक मे. विलास जावडेकर इन्फिनिटी प्रा.लि. या संस्थेने महानगरपालिकेसोबत ६ नोव्हेंबर २०२३ रोजी एक करार केला. कंपनीने ८७ हजार ३१८ चौरस मीटर बांधकाम करून देण्याच्या मोबदल्यात महापालिकेला ६ लाख ९३ हजार ४४८ चौरस मीटर एमिनीटी टीडीआर देण्याचे ठरले. या बांधकामासाठी जे अंदाजपत्रक केले त्याला स्थापत्य विभागाने मंजुरी दिली. त्यानुसार संपूर्ण बांधकामाचा खर्च ५६८ कोटी २६ लाख आहे. बांधकामाचे क्षेत्र ७८ हजार ३१८ चौरस मीटर आहे. ६५ हजार ८० रुपये प्रमाणे प्रति चौरस मीटर बांधकाम खर्चाला मान्यता दिली. प्रत्यक्षात २०२३ -२४ च्या एएसआर (रेडी रेकनर) नुसार ती २६ हजार ६२० रुपये होती. तब्बल ३८ हजार ६४० रुपये प्रति चौरस फूट जादा दराप्रमाणे या प्रकल्पाचे अंदाजपत्रक फुगवले गेले. त्याचाच मोठा परिणाम हा झाला की, एमिनीटी टीडीआरमध्ये मोठी वाढ झाली आहे. खरे तर, जिथे ६६५ कोटी रुपयांचा टीडीआर मिळाला असता तिथे तो तब्बल दुप्पट म्हणजे ११३६ कोटींचा जादा टीडीआर विकासकाला मिळणार आहे. ६७१ कोटींचा नेट फायदा या अधिकाऱ्यांनी या विकासकला करून दिला आहे, असा अत्यंत गंभीर आरोप करताना ते म्हणाले, मोठ्यात मोठ्या विकासकाचा दर २३ हजाराच्या पुढे नाही. हा कोण मायचा लाल लागून गेला की त्याला ६५ हजार ८० रुपये प्रमाणे बांधकाम खर्चाला मान्यता दिली गेली. तब्बल ६७१ कोटी रुपये कोणाच्या घशात चाललेत, असा सवाल वडेट्टीवार यांनी केला.

### दोषींना गजाआड करा

महापालिका सेवेसाठी नाही तर विकासकाच्या फायद्यासाठी काम करते आहे, असा आरोप वडेट्टीवार यांनी केला. ६ नोव्हेंबरला करार होतो, ७ नोव्हेंबरला बांधकामाचा दाखला दिला जातो आणि बेसमेंट खोदून पूर्ण झाल्याचे दाखवले जाते. तब्बल ८ लाख टीडीआर दिला. एका दिवसात एवढ्या मोठ्या कामाचे खोदकाम होते का याचा विचार केला पाहिजे. जो त्याचे बांधकाम झाल्याशिवाय २५ टक्के टीडीआर देता येत नाही, असा नियम आहे. मग ५ टक्के टीडीआर खोदाकाम झाले म्हणून दिला कसा ? नियमानुसार २८ कोटी ४० लाखाची बँक गॅरंटी महापालिकेने घेणे आवश्यक असताना फक्त १ कोटींचीच बँक गॅरंटी घेतली, असेही वडेट्टीवार म्हणाले. महापालिका आयुक्तांपासून डझनभर अधिकारी घरी गेल्याशिवाय राहणार नाहीत इतका मोठा घोटाळा आहे. नियत साफ असेल तर या घोट्ळ्याची सखोल चौकशी करून सरकार कारवाई करणार आहे का, हा प्रश्न वडेट्टीवार यांनी केला. दोषींना गजाआड करा, अशी मागणी त्यांनी केली.

---

# गुड न्यूज! लोणावळ्यात देशातील सर्वात मोठा ग्लास स्कायवॉक!

## प्रकल्पाचा मार्ग मोकळा, राज्य सरकारचा मोठा निर्णय

**। मावळ । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**मावळ (जि. पुणे) आणि त्यातही लोणावळा येथील पर्यटनाला आता आणखी चालना मिळणार आहे. कारण तेथील 333 कोटी 56 लाख रुपयांच्या पर्यटन प्रकल्पाच्या डीपीआरला राज्य सरकारने आज मंजुरी दिली. त्यात लोणावळ्यातील टायगर आणि लायन्स पॉईंटदरम्यान काचेचा स्कायवॉक उभारला जाणार असल्याने लोणावळा-खंडाळ्यातील पर्यटन आणखी बहरणार आहे.**



मावळचे राष्ट्रवादी कॉंग्रेसचे (अजित पवार गट) आमदार सुनील शेळके यांनी आज दुपारी येथील विधानभवन आवारात ही माहिती दिली. मावळच्या वैभवात भर टाकणारा हा प्रकल्प असल्याचे त्यांनी सांगितले. त्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांच्यासह सर्व राजकीय पक्षांच्या नेत्यांचे शेळकेंनी आभार मानले.

दोन महिन्यात या कामाची सुरुवात होणार असून अडीच वर्षात ते पूर्ण होईल, असे ते म्हणाले. त्यानंतर लोणावळ्याला भेट देणाऱ्या रोजची पर्यटक संख्या तिप्पट होऊन ती पन्नास हजारावर जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. देशातील एवढा मोठा काचेचा स्कायवॉक प्रथमच लोणावळ्यात होत असल्याने तेथील पर्यटनाला बूस्टर डोस मिळणार आहे, असा विश्वास आमदार सुनील शेळकेंनी व्यक्त केला.

### मावळच्या वैभवात भर टाकणारा प्रकल्प

राज्यात सत्ताबदल होऊन युतीचे सरकार आले. त्यात यावर्षी अजितदादा महायुतीत सहभागी झाले. ते पुन्हा उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री झाल्याने या पर्यटन प्रकल्पाला वेगाने चालना मिळाली. त्यांनी २१ सप्टेंबर रोजी सह्याद्री अतिथीगृह मुंबई येथे लोणावळा पर्यटन प्रकल्पाबाबत बैठक घेऊन त्याचा डीपीआर करण्याचा आदेश पर्यटन विभागाला दिला होता. तीन महिन्यांत तो तयार करून आज मंजूरही झाल्याने आता या प्रकल्पाचे काम सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

# पदपथांच्या दुरवस्थेची उच्च न्यायालयाने घेतली दखल!

## पादचाऱ्यांचे हक्क दुर्लक्षित केले जात आहेत : न्यायालय

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहरातील पदपथ दुरवस्थेची मुंबई उच्च न्यायालयाकडून दखल घेण्यात आली आहे. पुणे महापालिका, राज्याचा नगरविकास विभाग तसेच नगररचना विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, महामेट्रो आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने त्यांची भूमिका स्पष्ट करणारे शपथपत्र दाखल करावे असे आदेश न्यायालयाने दिले आहेत.**

शपथपत्र सादर करण्यासाठी २७ डिसेंबरपर्यंतची मुदत देण्यात आली असून याचिकेवरील सुनावणी १७ जानेवारी रोजी होणार आहे. महापालिकेकडून पादचाऱ्यांचे हक्क दुर्लक्षित केले जात आहेत. शहरात निकृष्ट दर्जाचे पदपथ असून काही ठिकाणी पदपथ खड्डे पडलेल्या, मोडक्या अवस्थेत आहेत. तर काही ठिकाणी पदपथच नसल्याची वस्तुस्थिती आहे. ज्या भागात पदपथ आहेत, त्यावर अतिक्रमणे झाली आहेत. त्यामुळे पादचाऱ्यांचे हक्क डावलले जात असल्याचे नमूद करत सामाजिक कार्यकर्ता कनिझ सुखरानी यांनी मुंबई उच्च न्यायालयात ॲड. सत्या मुळ्ये यांच्या मार्फत याचिका दाखल केली होती. त्याची दखल घेत महापालिका आणि महामेट्रोला शपथपत्र सादर करण्याचे आदेश न्यायालयाने



दिले आहेत. शहरातील पदपथांवर विविध प्रकारचे अतिक्रमण झाले आहे. त्यामुळे पादचाऱ्यांना विनाअडथळा चालणे अडचणीचे ठरत आहे. पादचारी मार्गाअभावी रस्त्यावरून मार्गक्रमण करावे लागत असल्याने अपघातही होत आहेत. महामेट्रोकडून मेट्रो रेल्वे स्थानकांना जोडणाऱ्या प्रवेशद्वारासाठी केलेल्या पायऱ्यांनी पदपथ गिळंकृत केले आहेत. महामेट्रोकडून पदपथांची रुंदी आणि लांबीही कमी करण्यात आली आहे. नगर रस्ता, औंध रस्ता, कर्वे रस्ता, सातारा रस्ता, बाणेर रस्ता, स्वारगेट, पाषाण रस्ता, कोरेगाव पार्क, फर्ग्युसन कॉलेज आणि जंगली महाराज रस्त्यावरील पदपथ फेरीवाल्यांनी व्यापले आहेत. तर इंडियन रोड काँग्रेसच्या निकषांनुसार पदपथांची रचना नाही. याचिका दाखल झाल्यानंतरही महापालिकेकडून पदपथ मोकळे करण्यात आले नाहीत. तसेच पदपथांवरील अतिक्रमणांवर कारवाई करण्यात आली नाही, अशी बाब ॲड. सत्या मुळ्ये यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली.शहरातील पदपथ दुरवस्थेची मुंबई उच्च न्यायालयाकडून दखल घेण्यात आली आहे. पुणे महापालिका, राज्याचा नगरविकास विभाग तसेच नगररचना विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, महामेट्रो आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने त्यांची भूमिका स्पष्ट करणारे शपथपत्र दाखल करावे असे आदेश न्यायालयाने दिले आहेत.

### शपथपत्र सादर करण्याचे आदेश

महापालिकेकडून पादचाऱ्यांचे हक्क दुर्लक्षित केले जात आहेत. शहरात निकृष्ट दर्जाचे पदपथ असून काही ठिकाणी पदपथ खड्डे पडलेल्या, मोडक्या अवस्थेत आहेत. तर काही ठिकाणी पदपथच नसल्याची वस्तुस्थिती आहे. ज्या भागात पदपथ आहेत, त्यावर अतिक्रमणे झाली आहेत. त्यामुळे पादचाऱ्यांचे हक्क डावलले जात असल्याचे नमूद करत सामाजिक कार्यकर्ता कनिझ सुखरानी यांनी मुंबई उच्च न्यायालयात ॲड. सत्या मुळ्ये यांच्या मार्फत याचिका दाखल केली होती. त्याची दखल घेत महापालिका आणि महामेट्रोला शपथपत्र सादर करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. शपथपत्र सादर करण्यासाठी २७ डिसेंबरपर्यंतची मुदत देण्यात आली असून याचिकेवरील सुनावणी १७ जानेवारी रोजी होणार आहे.

# पुणे लोकसभा मतदारसंघात पोटनिवडणूक घ्या!

## मुंबई उच्च न्यायालयाचे केंद्रीय निवडणूक आयोगाला आदेश

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महिन्यांहून अधिक काळापासून रिक्त असलेली पुणे येथील लोकसभा मतदारसंघात पोटनिवडणूक घेण्याचे आदेश उच्च न्यायालयाने बुधवारी केंद्रीय निवडणूक आयोगाला दिले. ही निवडणूक न घेण्याबाबत आयोगाला मिळालेले प्रमाणपत्री न्यायमूर्ती गौतम पटेल आणि न्यायमूर्ती कमल खाता यांच्या खंडपीठाने मनमानी, कायद्याचे उल्लंघन करणारे आणि बेकायदा असल्याचे नमूद करून यावेळी रद्द केले.**

दरम्यान, अन्य राज्यातील निवडणुका घेण्यात आणि आगामी लोकसभा निवडणुकीच्या तयारीत व्यग्र असल्याने भाजप खासदार गिरीश बापट यांच्या निधनानंतर रिक्त झालेली पुणे येथील लोकसभा मतदारसंघात पोटनिवडणूक घेणे कठीण झाले होते, असा दावा केंद्रीय निवडणूक आयोगाने सोमवारी झालेल्या सुनावणीच्या केला होता. त्यावर, पुण्यात मणिपूरसारखी अशांततेची परिस्थिती होती का ? अशी विचारणा करून न्यायालयाने आयोगाच्या या दाव्याबाबत प्रश्न उपस्थित केला होता. तसेच, आयोगाचा हा दावा पटण्यासारखे नसल्याचेही सुनावले होते.




मणिपूरमधील अशांततेच्या वातावरणासारखी स्थिती पुण्यात असती, तर आयोगाचे म्हणणे मान्य केले असते. परंतु, पुण्यात मणिपूरसारखी स्थिती होती का की त्यामुळे ही पोटनिवडणूक घेणे आयोगाला खूपच कठीण होते, अशी विचारणाही न्यायमूर्ती पटेल आणि न्यायमूर्ती खाता यांच्या खंडपीठाने आयोगाकडे केली होती. दुसरीकडे, ही पोटनिवडणूक आता घेण्यात आली तरी वियजी उमेदवाराला फारच कमी काळ खासदारकी मिळेल, असा दावा आयोगातर्फे करण्यात आला होता. त्यावर याचिकाकर्त्याच्या वकिलांनी आक्षेप घेतला. तसेच. पुणे लोकसभा मतदारसंघातील पद रिक्त झाल्यानंतरही आयोगाने इतर ठिकाणच्या पोटनिवडणुका घेतल्याकडे याचिकाकर्त्यांच्या वतीने न्यायालयाचे लक्ष वेधले होते. न्यायालयानेही त्याची दखल घेतली होती. तसेच, मोर यांना हा तपशील प्रतिज्ञापत्राद्वारे सादर करण्याचे आदेश देऊन प्रकरणाची सुनावणी बुधवारी ठेवली होती. या पार्श्वभूमीवर बुधवारी झालेल्या सुनावणीच्या वेळी न्यायालयाने याचिकाकर्त्यांच्या सगळ्या मागण्या मान्य करत असल्याचे सांगून याचिका निकाली काढली.

### न्यायालयाने आधीच दिला होता इशारा

बापट यांच्या निधनानंतर पुणे लोकसभा मतदारसंघाची पोटनिवडणूक कायद्यानुसार सहा महिन्यांत घेण्याची तरतूद आहे. असे असताना ही पोटनिवडणूक का घेण्यात आली नाही, अशी विचारणा उच्च न्यायालयाने केंद्रीय निवडणूक आयोगाला केली. तसेच, याबाबत भूमिका स्पष्ट करा, अन्यथा याचिकाकर्त्याच्या बाजूने निर्णय देण्याचा इशारा यापूर्वी आयोगाला दिला होता.

# इंद्रायणी ही महाराष्ट्राची 'गंगा'!

## प्रदूषण मुक्त करा: आमदार महेश लांडगे यांची मागणी

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहरातीलश्रीक्षेत्र आळंदी आणि श्रीक्षेत्र देहू या तीर्थक्षेत्रांना जोडणारी इंद्रायणी म्हणजे महाराष्ट्रातील पवित्र गंगा आहे. संपूर्ण देशभरातील भाविकांच्या श्रद्धास्थानी असलेली ही इंद्रायणी व पिंपरी-चिंचवडची जीवनवाहिनी असलेली पवना नदी प्रदूषणाच्या विळख्यात आहे. या नद्यांच्या संवर्धनासाठी राज्य सरकार आणि महापालिका प्रशासनाने पुढाकार घेतला पाहिजे, अशी आग्रही मागणी आमदार महेश लांडगे यांनी केली.**



“पवना, इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पासाठी पीसीएमसी,पीएमआरडीए प्रशासनाने सादर केलेले ‘डीपीआर’ ला राज्य सरकारकडे तत्वत: मान्यता दिली आहे. पहिल्या टप्प्यातील ९९५ कोटी रुपयांच्या संयुक्त ‘डीपीआर’ला केंद्र सरकारची मंजुरी मिळणे अपेक्षीत आहे. तसेच, राज्य सरकारच्या पर्यावरण विभागाचा ना हरकत दाखला आणि निधीची उपलब्धता याबाबत पाठपुरावा करीत आहोत. सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प, औद्योगिक अस्थापना व बेकायदा भंगार दुकांनामुळे होणारे नदी प्रदूषण यावर तात्काळ कारवाई सुरू करण्याचे आदेश कॅबिनेट मंत्री उदय सामंत यांनी दिले आहेत.

**–महेश लांडगे,**
आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड..

आमदार लांडगे म्हणाले की, इंद्रायणी व पवना नदी प्रदूषणमुक्त करण्यासाठी सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारणे, नदी पात्रालगत बेकायदेशीरपणे सुरू असलेले भंगार कारखाने आणि रसायनमिश्रीत पाणी नदी सोडणाऱ्या कंपन्यांवर कारवाईसाठी कठोर धोरण ठरवावे लागेल. त्यासाठी स्वतंत्र अधिकारी किंवा यंत्रणा कार्यान्वयीत करावी लागेल. नदी प्रदूषणाबाबत वेळोवळी पर्यावरण प्रेमी, संस्था संघटनांच्या वतीने आंदोलने करण्यात आली आहे. यावर काहीअंश महापालिका प्रशासनाने पुढाकार घेतला. पण, पूररेषेच्या आत होणारी बांधकामे थांबवली पाहिजेत. काही नाले थेट नदी पात्रात सोडले आहेत. त्यामुळे नदी प्रदूषित होते आहे. यावर पूर्वी कारवाई होत होती. मात्र, २०१९ नंतर ही कारवाई थांबवली आहे. तसेच, नदी पात्रालगत काही भंगार व्यावसायिकांनी गोदामे घातली आहेत. नदी पात्रालगत भंगार जाळले जाते. त्यातील रसायनमिश्रीत पाणी नदीपात्रात सोडले जाते. त्यावर करावाई झाली पाहिजे. नदी सुधार प्रकल्पासाठी महापालिका प्रशासनाने ९९५ कोटी रुपयांचा ‘डीपीआर’ तयार केला होता. त्याला राज्य सरकारने तत्वत: मान्यता दिली आहे. तो राज्य सरकारकडे पाठवला आहे. त्याला मंजुरी मिळाल्यास पीसीएमसी, पीएमआरडीए, एमआयडीसी अशा सर्व अस्थापनांद्वारे नदी सुधार प्रकल्पाला चालना देता येईल.

यावर राज्याचे कॅबिनेट मंत्री उदय सामंत यांनी याबाबत सकारात्मक उत्तर दिले. महापालिका, पीएमआरडीए आणि एमआयडीसी अशा तिनही अस्थापनांना एकत्रितपणे नदी सुधार प्रकल्पावर कार्यवाहीचे आदेश दिले आहेत.

# 'त्या' कुटुंबीयांना आर्थिक मदत!

## तळवडे आग दुर्घटना : कामगार मंत्री सुरेश खाडे यांची घोषणा

। नागपूर । महाईन्यूज । प्रतिनिधी।


**महिन्यांहून पुण्यातील तळवडे येथील शिवराज एंटरप्रायझेस येथे स्पार्कल कॅण्डल बनवित असताना अचानक लागली होती. या आगीतील मृत कामगारांच्या कुटुंबियांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून प्रत्येकी पाच लाख रुपयांची मदत देणार असल्याचे कामगारमंत्री सुरेश खाडे यांनी विधानसभेत एका निवेदनाद्वारे सांगितले.**

८ डिसेंबर रोजी अचानक आग (फ्लॅश फायर) लागली होती. या घटनेत एकूण १५ महिला कामगारांपैकी ६ महिलांचा जागीच मृत्यू झाला. जखमी महिला कामगारांपैकी ९ जखमी कामगारांवर उपचार सुरु असताना त्यापैकी ३ कामगारांचा मृत्यू झाला. उर्वरित ६ महिला कामगार व एका पुरुष व्यक्तीवर उपचार सुरु आहेत, असे मंत्री सुरेश खाडे यांनी सांगितले.

ही आस्थापना तळवडे, पुणे येथील जन्नत नजीर शिकलगार यांच्या मालकीच्या जागेत शिवराज एंटरप्रायझेस या नावाने कार्यरत होती. या आस्थापनेचे बांधकाम हे अनधिकृत असून आवश्यक मान्यता घेतली नसल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच या आस्थापनेने कारखाने अधिनियमांतर्गत परवाना घेतला नसल्याचे दिसून आले असल्याचे मंत्री सुरेश खाडे यांनी निवेदनातून स्पष्ट केले.

औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाकडून खटले दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे. घटनेनंतर या आस्थापनेवर कामगार उपआयुक्त कार्यालयामार्फत विविध कायद्यांतर्गत निरीक्षण शेरे नोंदविण्यात आलेले असून खटले दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच प्रदूषण नियंत्रण मंडळाने या आस्थापनेस उत्पादन प्रक्रिया थांबविण्याचे आदेश दिले आहेत, अशी माहिती कामगारमंत्री सुरेश खाडे यांनी सभागृहात दिली.

या प्रकरणी अग्निशमन विभागाकडून संबंधित पोलीस स्टेशनला आस्थापनेविरुद्ध भारतीय दंड संहिता, बाल व किशोर कामगार प्रतिबंध व विनियमन अधिनियम, १९८६ तसेच स्फोटक अधिनियम, १८८४ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच कारखान्याच्या जागेचे मालक, आस्थापनेचे मालक व उत्पादनासाठी कच्चा माल पुरवविणारे पुरवठादार यांना अटक करण्यात आली असून सद्यस्थितीत ते अटकेत आहेत.



### मृतांच्या कुटुंबियांना प्रत्येकी 5 लाख रुपए

**कंपनीतील मृत व जखमी कामगारांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत आयुक्तांना कळविण्यात आले आहे. तसेच जखमींवर शासकीय खर्चाने उपचार व मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष निधीतून मृतांच्या कुटुंबियांना प्रत्येकी पाच लाख रुपयांची मदत देण्याचे जाहीर केले आहे. घटनेच्या अनुषंगाने पुढील चौकशी सुरु असून संबंधिताविरुध्द कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरु असल्याचे कामगारमंत्री सुरेश खाडे यांनी यावेळी सांगितले.**

# मोशी येथे किसान-२०२३ कृषि प्रदर्शनाचे उत्साहात उद्घाटन

। पिंपरी।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

भारतातील सर्वात मोठे कृषि प्रदर्शन असलेल्या किसान २०२३ या ३२ व्या कृषिप्रदर्शनाचे पुणे आंतरराष्ट्रीय प्रदर्शन व संमेलन केंद्र, मोशी येथे उद्घाटन करण्यात आले. दरवर्षीच्या प्रथेप्रमाणे पहिल्या येणाऱ्या शेतकऱ्यांच्या गटातर्फे हे उद्घाटन करण्यात आले. यामध्ये महाराष्ट्रातील विविध भागातून आलेल्या शेतकऱ्यांचा समावेश होता. हे प्रदर्शन १७ डिसेंबर २०२३ पर्यंत सकाळी ९ ते सायंकाळी ५ पर्यंत सुरू राहील.

१५ एकर प्रदर्शन क्षेत्रावर ४५० हून अधिक कंपन्या, संशोधन संस्था, नव उद्योजक शेतीतील नवीन तंत्रज्ञान व उत्पादने सादर करतील. प्रदर्शनात, ५ दिवसांमध्ये देशभरातून एक लाखाहून अधिक शेतकरी भेट देतील असा अंदाज आहे. आधुनिक तंत्रज्ञान व नवे विचार शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविणे हे किसान प्रदर्शनाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

किसान प्रदर्शनाला शेती क्षेत्रातील मान्यवर संस्थांचा सहभाग व सहकार्य लाभले आहे. यंदा किसान प्रदर्शनात संरक्षित शेती, पाणी नियोजन, कृषी निविष्ठा, यंत्रसामुग्री, पशुधन, जैव, ऊर्जा, वाटिका व शेती लघु उद्योग अशी विभागवार दालने उभी करण्यात आलेली आहेत. प्रत्येक दालनात त्या विशिष्ठ विभागातील स्टॉल शेतकऱ्यांना पाहायला मिळतील. शेतीसाठी लागणारी यंत्रे व उपकरणांचे प्रदर्शन खुल्या जागेत केले आहे.

मोबाईलचा वाढता वापर आणि डिजीटल इंडिया उपक्रमांमुळे शेतकऱ्यांशी संवाद साधणे सहज शक्य झाले आहे. यामुळेच उद्योजक नवनवीन सेवा व उत्पादने शेतकऱ्यांसमोर मांडण्यास उत्सुक आहेत. हे उद्योजक प्रामुख्याने बाजारभाव, जल व्यवस्थापन, शेतमालाचे मूल्यवर्धन, जैवतंत्र या क्षेत्रात नवीन संकल्पना घेऊन येत आहेत. या प्रदर्शनात शेतकरी कृषी क्षेत्रात येऊ घातलेले नवीन तंत्रज्ञान व त्यामुळे निर्माण होणाऱ्या संधींची माहिती घेऊ शकतील. प्रदर्शनामध्ये कृषी क्षेत्रातील नवउद्योजकांसाठी स्पार्क या दालनाचा समावेश असणार आहे.




# घरदार सोडून सौरऊर्जेविषयी जनजागृती

**अहमद झाकी यामनी, त्यांनी एकदा म्हटलं होतं, “अश्मयुगाचा अंत झाला, ते युग समाप्त झालं कारण त्याहून स्वस्त आणि सोयीस्कर तंत्रज्ञान विकसित झालं. तसंच पृथ्वीच्या पोटातलं खनिजतेल संपुष्टात येण्यापूर्वीच खनिज तेलाचं युग संपुष्टात येईल. मी खनिज तेलाचं आगर असणाऱ्या सौदी अरेबियाचं प्रतिनिधित्व करतो, पण मला हे पक्कं माहीत आहे भविष्यात खूप मोठी आर्थिक आव्हानं उभी राहणार आहे.**




सध्या जैवइंधनाला पर्याय नाही, हे मान्यच पण तो शोधावा लागेल हे वास्तव स्वीकारून काही जण कामाला लागले आहेत. त्यापैकीच एक आहेत चेतन सिंग सोळंकी. आयआयटी म्हणजे केवळ गलेलठ्ठ पॅकेज खिशात घालण्याचं ठिकाण नाही, तर जगात काही अंशांचा का असने सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी स्वतःला सज्ज करण्याचं ठिकाण, असं ज्यांना वाटतं अशा काही मोजक्या आयआयटीयन्सपैकी हे एक. आयआयटीतील शिक्षण संपवून ते पाच वर्षं युरोपात राहिले. तिथे पीएचडी केली. आयआयटी पवईमध्ये प्राध्यापक म्हणून रुजू झाले. २०१९ मध्ये वर्ल्ड टूरला गेले. अभ्यास, काम, नोकरीच्या निमित्ताने जगाच्या विविध भागांत फिरताना आपण सारेच ‘चुकीच्या ऊर्जेचा’, चुकीच्या पद्धतीने आणि वारेमाप वापर करत असल्याचं त्यांना जाणवलं. शिक्षक म्हणून काम करताना विद्यार्थ्यांचं प्रबोधन करता येईल, मात्र त्याचं प्रमाण फारच मर्यादित असेल, सरकार दरबारी प्रयत्न करता येईल, मात्र सरकार बदललं की धोरणं बदलतात, त्यामुळे ते ही फारसं प्रभावी ठरणार नाही, असं त्यांना वाटलं आणि त्यांनी थेट लोकांमध्ये जायचं ठरवलं. प्राध्यापकी आणि घरदार सोडून सोळंकी एनर्जी स्वराज यात्रेवर निघाले. त्यांच्या यात्रेचे हजार दिवस नुकतेच पूर्ण झाले आणि या कालावधीत त्यांनी सुमारे हजार किलोमीटर प्रवास केला आहे. या अंतर्गत ते देशातील विविध शहरांत जातात, तिथल्या शालेय विद्यार्थी, अभ्यासकांपासून धोरणकर्त्यांपर्यंत विविध स्तरांतील माणसांना भेटतात आणि सौर ऊर्जा व शाश्वत जीवनशैलीसंदर्भात जनजागृती करतात. नुकतंच त्यांना जिनिव्हामध्ये झालेल्या संयुक्त राष्ट्रांच्या परिषदेत ऊर्जावापरासंदर्भात विचार मांडण्यासाठी निमंत्रित करण्यात आलं होतं. सोळंकी म्हणतात, आपण पृथ्वीचा आकार वाढवू शकत नाही. त्यावरच्या साधनसंपत्तींचं- हवा, पाणी, खनिजांचं प्रमाण वाढवू शकत नाही. तरीही तथाकथित विकास साधताना याच साधनसंपत्तीचा वारेमाप वापर करत आहोत. हवा, मृदा, पाणी प्रदूषित करणारा विकास काय कामाचा? आज जगात जी स्पर्धा सुरू आहे, अमानुष हिंसाचार होत आहे, त्याच्या मुळाशी ही साधनसंपत्तीवरील वर्चस्वाचीच स्पर्धा आहे. यावर उपाय म्हणजे ‘जेवढं कमी तेवढं उत्तम!’ हे ब्रीद अंगिकारणं. जगातील प्रत्येकजण आपापल्या गरजा जेवढ्या सीमित ठेवेल तेवढी ही साधनसंपत्ती अधिक काळ पुरेल, तिला नवनिर्मितीसाठी अवकाश मिळेल. ऊर्जा- मग ती कोणत्याही स्वरूपातली असो- तिचा वापर सीमित ठेवणंच उत्तम. मी सौर ऊर्जेचा पुरस्कर्ता असलो, तरीही म्हणेन की सौर ऊर्जाही शक्य तेवढी कमीच वापरली पाहिजे. तुम्ही म्हणाल की सौर ऊर्जेचा मनसोक्त वापर करायला काय हरकत आहे? त्यामुळे तर प्रदूषणही होत नाही. मात्र सौर ऊर्जा निर्मितीसाठी सिलिकॉन सेल, मॉड्युलसाठी काच, लोखंडी चौकट, तांब्याच्या तारा, बटरी इन्व्हर्टर असं बरंच काही निर्माण करावं लागतं. या साठीचा कच्चा माल निसर्गातूनच येतो. खाणीतून खनिजं मिळवा, त्यांचं शुद्धिकरण करा यातून आपण साधनसंपत्तीचंच शोषण करत असतो. स्ट्रक्चर बसविण्यासाठी जमीन खोदावी लागते. शिवाय उपकरणं निकामी झाली की पुनर्वापरासाठीही विविध रसायनांचा वापर करावा लागतो. आपण म्हणतो की उपचारांपेक्षा प्रतिबंध श्रेष्ठ. सौरऊर्जा वापरणे हा केवळ उपचार आहे आणि ऊर्जा वापर होता होईल, तेवढा टाळणे हा प्रतिबंध आहे. विकसित असो वा विकसनशील देश प्रत्येकाने या प्रतिबंधावर भर दिला पाहिजे. आपल्याला परवडतं म्हणून आपण गिझर, एअरकंडिशनर, इस्त्री वापरतो. पण हे सारं निसर्गाला परवडणारं नाही हे कायम लक्षात ठेवलं पाहिजे. आपला एवढा मोठा देश ऊर्जेबाबत प्रचंड परावलंबी आहे. देशातल्या एकूण ऊर्जेपैकी ७४ टक्के ऊर्जा कोळशापासून निर्माण केली जाते. १२ टक्के जलविद्युत, ३ टक्के आणुऊर्जा आणि १२-१३ टक्के सौर आणि पवनऊर्जा वापरली जाते.

## संपादकीय »

### नेहरू मुक्तीनंतर

***जम्मू-काश्मीरचा विशेष दर्जा काढून घेऊन त्यास अन्य राज्यांच्या मालिकेत बसवणे हा एक भाग. तो प्रत्यक्षात आणताना सर्वोच्च न्यायालयाचे भाष्य आणि कृती एका नव्या धोक्यास जन्म देते.***

जम्मू-काश्मिरास विशेष दर्जा देणारा ‘अनुच्छेद ३७०’ रद्द करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने वैध ठरवला हा एक भाग. तसे होणे अपरिहार्यच होते. मुद्दा होता ही अपरिहार्यता अमलात आणण्याच्या मार्गाबाबत. या संदर्भात केंद्राच्या मूळ निर्णयावर भाष्य करणाऱ्या ‘लोकसत्ता’च्या ६ ऑगस्ट २०१९ च्या ‘ऐतिहासिक धाडसानंतर’ या संपादकीयात एक टिप्पणी होती. “राज्य पातळीवर विधानसभा अस्तित्वात नसताना त्या राज्याच्या अस्तित्वाबाबत निर्णय घेण्याची नवी प्रथा घातक ठरते. घटनाकारांना संघराज्य व्यवस्थेवर असा घाला निश्चितच अभिप्रेत नव्हता. यामुळे केंद्राविषयी राज्यांच्या मनांत अविश्वास निर्माण होऊ शकतो. तसे झाल्यास देशाच्या आरोग्यास ते अपायकारक असेल” हे चार वर्षांपूर्वीच्या संपादकीयातील मूळ विधान.

**देशाच्या लोकसंख्येच्या फक्त दोन टक्के इतकी अल्प संख्या असलेल्या समुदायाचा सदस्य या नात्याने मी आजचे लिखाण करतो आहे. विधिमंडळात लोकप्रतिनिधींची निवड करण्याच्या ‘जास्त मते तोच एकमेव विजयी’ या प्रणालीनुसार, भाजपने तीन हिंदी भाषक राज्यांमधील विधानसभा निवडणुकीत बाजी मारली आहे.**

## ‘येणार तर भाजपच...’ पण कशी?



काँग्रेसने आदिवासींची आणि महिलांची मते गमावली. आदिवासी मतांमध्ये काँग्रेसकडून भाजपकडे झालेले स्थित्यंतर भाजपला मध्य प्रदेश, राजस्थान आणि विशेषत: छत्तीसगडमध्ये सत्तेकडे नेणारे ठरले. भाजप आणि काँग्रेस यांनी मिळवलेल्या एकूण मतांच्या टक्केवारीतील फरक राजस्थान आणि छत्तीसगडमध्ये अंदाजे दोन टक्के होता. मध्य प्रदेश या मोठ्या राज्यात हाच फरक आठ टक्के इतका होता : तेथे काँग्रेसला ४० टक्के, तर विजेत्या भाजपला एकूण वैध मतांपैकी ४८ टक्के मते मिळाली. भाजपसाठी हा दणदणीत विजय होता. मोदी यांचे नेतृत्व त्यामुळे झळाळले. देशातील सर्व राजकीय नेत्यांपेक्षा ते सर्वात लोकप्रिय आहेत, सर्वाधिक करिष्मा त्यांच्याकडे आहे, हे आता त्यांचे कडवे टीकाकारही नाकारू शकत नाहीत. ‘आता मोदीच तिसऱ्यांदा निवडून येणार’ हेही या विजयामुळे निश्चित झाले आहे. हिंदीभाषक राज्यांचा अख्खा पट्टा मोदींच्याच पाठीशी असल्याने विजयश्री खेचून आणणे त्यांना अजिबात जड नाही. दक्षिण आणि पूर्व मोदींना पुरेशी साथ देत नाही, परंतु पश्चिम भारताची साथ मोदींना आहे. त्यामुळेच प्रश्न पडतो की २०२४ नंतर देशात कायकाय घडू शकते? गेल्या दशकभरात देशाची जातीय आधारावर विभागणी तीव्रपणे झाली आहे. हिंदू मतांच्या बळकटीकरणासाठी हिंदुत्ववादी शक्तींनी प्रयत्न केले. ते एका मर्यादेपर्यंत यशस्वी झाले ज्यामुळे भाजपला स्पष्ट विजय मिळत गेला. भारतीय मुस्लिम आणि भारतीय ख्रिश्चन समुदाय मिळून भारताच्या लोकसंख्येपैकी केवळ १८ टक्के आहे. शीख, ज्यांना त्यांच्या मनाविरुद्ध भाजप ‘हिंदू’च समजते, त्यांची संख्या केवळ दोन टक्के आहे. गोव्यात पोर्तुगीज राजवटीला जेव्हा कसलेही आव्हान नव्हते, तेव्हा गोव्यातील ख्रिश्चनांपैकी ब्राह्मण आणि क्षत्रियांना महत्त्व मिळत गेले, त्याप्रमाणे २०२४ नंतरही हिंदू पट्ट्यातील पुढारलेल्या जातींना अधिक वाव मिळेल का, अशी शंका येते. ओबीसी आणि अनुसूचित जाती व जमाती यांचाही समावेश भाजपच्या मतदारांत आहे आणि रा. स्व. संघालाही हे माहीत आहे, पण या संघटना त्या समुदायांना हिंदू असण्याचा अभिमान आणि ‘८० टक्क्यांमधील’ असल्याचे समाधान देऊ शकतात, तोवर ही शंका रास्त ठरते. मोदींच्या पहिल्या दोन कार्यकाळात मुस्लीम समुदायाला घेरण्यात आले- त्या समुदायाला सत्ताधारी वर्गाने दुय्यम मानले. गोमांस बाळगल्याच्या निव्वळ संशयावरून झुंडबळी (लिंचिंग), ‘लव्ह जिहाद’चे सरसकट आरोप आणि ‘सीएए’ तसेच ‘एनआरसी’ने निर्माण केलेली भीती यांतून भारताचे नागरिक म्हणून समानतेची आस मुस्लिमांना बाळगता येणार नाही, असाच संदेश गेला आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# मला गोळी मारली जाईल!

## » मराठा आरक्षणप्रश्नी भुजबळांचा गंभीर आरोप

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मराठा आरक्षणावरून राज्यातील प्रश्न जटील बनत चालला आहे. मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण हवं असल्याने छगन भुजबळांनी नकार दिलाय. मराठा समाजाच्या आरक्षणाला आपला विरोध नसून ओबीसीतून त्यांना आरक्षण देण्यास विरोध केला आहे. गेल्या काही दिवसांत मनोज जरांगे पाटील विरुद्ध छगन भुजबळ यांच्यातील द्वंद्व अवघ्या महाराष्ट्राने पाहिले.**

मनोज जरांगेंनी छगन भुजबळांवर केलेले आरोप आज त्यांनी सभागृहासमोर मांडले. तसाच, एक गंभीर आरोप केला आहे. छगन भुजबळ यांनी आज मराठा आरक्षणप्रश्नी राज्यात निर्माण झालेल्या परिस्थितीवर सभागृहात भाष्य केलं. जवळपास पाऊणतास त्यांनी आज सभागृहात त्यांचं मत मांडलं. यावेळी त्यांनी मनोज जरांगेंवर टीकाही केली. तसंच, त्यांनी काही वृत्तांची कात्रणे सभागृहासमोर ठेवले. यात "आमच्या हातात दंडुके, सरकारला पायाखाली तुडवू शकतो", "जरांगेंचा पुन्हा हल्लाबोल, मी त्याचा कार्यक्रमच करतो", "आमच्या हातात दंडुके, सरकारला पायाखाली तुडवू शकतो, भुजबळांनाही पाहून घेऊ", ही मनोज जरांगे पाटलांची वृत्तपत्रात छापून आलेली वक्तव्ये त्यांनी सभागृहात वाचून दाखवले. २४ डिसेंबला नाशिकला भुजबळ नॉलेज सिटी, भुजबळ फॉर्म... ज्यांना कोणाला पाहायचं आहे, त्यांनी नावे कळवावी", हे पत्रकही त्यांनी वाचून दाखवलं. ते म्हणाले की, याचा





अर्थ माझ्यावर हल्ला करण्याची तयारी सुरू झाली. प्रकाश सोळंके, संदीप क्षीरसागरचं झालं, आता माझ्यावरही हल्ला होणार. "सकाळी उठलो आणि पाहिलं की सुरक्षा वाढवली आहे. सुरक्षा का वाढवली याची चौकशी केली तेव्हा पोलीस म्हणाले की वरून इनपूट आलेलं आहे की भुजबळांना गोळी मारली जाईल. पोलिसांचा अहवाल आहे", असा दावाही त्यांनी केला. "हरकत नाही. मी मरायला तयार आहे. माझा मराठा आरक्षणाला विरोध नाही. त्यांना वेगळं आरक्षण द्या. आज छगन भुजबळ आहे, प्रकाश सोळंके झाला. उद्या मी असेन. आपण त्यावर गप्प बसणार का? कोणी त्याचा निषेध करणार नाही? कोणी बघायला जाणार नाही? आज महाराष्ट्रसमोर हाच माझा प्रश्न आहे, असं छगन भुजबळ म्हणाले. मंत्री छगन भुजबळ आणि मराठा नेते मनोज जरांगे-पाटील यांच्यात आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. अशातच आज ( १२ डिसेंबर ) विधानसभेत छगन भुजबळांनी मोठा दावा केला आहे. मला गोळी मारली जाऊ शकते, असा दावा भुजबळांनी पोलिसांच्या अहवालाचा दाखला देत केला आहे. यावरून जरांगे-पाटलांनी भुजबळांना लक्ष्य केलं आहे. "माझ्यावर हल्ला करण्याची तयारी सुरू झाली आहे. प्रकाश सोळंके, संदीप क्षीरसागर यांची घरे जाळण्यात आली. कुणी बीडला जायला तयार नाही. आमचं सुद्धा हेच होईल. कुणी यावं अशी अपेक्षा नाही. माझी सुरक्षा वाढवण्यात आली आहे. याबद्दल पोलिसांनी सांगितलं की, 'तुम्हाला गोळी मारली जाईल,' असा अहवाल आलाय. मारा... हरकत नाही... मरायला मी तयार आहे. मराठा आरक्षणाला माझा विरोध नाही. मराठ्यांना वेगळं आरक्षण द्या. पण, ही झुंडशाही थांबवा," असं वक्तव्य छगन भुजबळांनी केलं आहे.

### छगन भुजबळांना सुट्टी नाही

» मारा... हरकत नाही... मरायला मी तयार आहे. मराठा आरक्षणाला माझा विरोध नाही. मराठ्यांना वेगळं आरक्षण द्या. पण, ही झुंडशाही थांबवा," असं वक्तव्य छगन भुजबळांनी केलं आहे. भुजबळांच्या विधानावर जरांगे-पाटलांनी टीका केली आहे. माध्यमांशी संवाद साधताना जरांगे-पाटील म्हणाले, "छगन भुजबळ काहीही वक्तव्य करत आहेत. माझ्या जीवाला धोका असल्याचं सांगून गुन्ह्यांतून बाहेर पडण्याचा प्रयत्न भुजबळांकडून केला जातोय. हेच देवेंद्र फडणवीसांच्या लक्षात येत नाही. सरकारही भुजबळांना घाबरत आहे. "भुजबळ मंत्री असून त्यांनी चांगलं बोलावं. मराठ्यांबद्दल राग व्यक्त करू नये. आम्ही ओबीसी बांधवांबद्दल एक शब्द तरी काढतो का? भुजबळांवर मी आयुष्यभर बोलणार.. त्यांना सुट्टीच नाही," असा इशारा जरांगे-पाटलांनी दिला आहे. छगन भुजबळ बधिर झाले आहेत. त्यांचं वय झाल्यानं काहीही बोलत आहेत. त्यांना काहीही कळत नाही," असं टीकास्त्रही जरांगे-पाटलांनी डागलं आहे.

# शिवराय सुरतला गेले, म्हणून मी गेलो

## » गोगावलेंच्या वक्तव्यावर ठाकरे गट संतप्त

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणावर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यासमोर सुनावणी पार पडत आहे. शिवसेना ( ठाकरे गट ) वकील देवदत्त कामत यांच्याकडून शिंदे गटातील आमदार भरत गोगावले यांची उलटतपासणी पार पडली. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज सुरतला गेले, म्हणून मी गेलो, असं उत्तर गोगावलेंनी दिलं आहे. यावरून नव्या वादाला तोंड फुटलं आहे. विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनीही गोगावलेंवर सडकून टीका केली आहे.**

वकील देवदत्त कामत यांनी 'तुम्ही सुरतला कशासाठी गेला होता?' असा प्रश्न भरत गोगावलेंना विचारण्यात आला. त्यावर "छत्रपती शिवाजी महाराज सुरतला गेले होते, म्हणून मी गेलो होतो," असं उत्तर दिलं गोगावलेंनी दिलं. गोगावलेंच्या वक्तव्यावर बोलताना अंबादास दानवे म्हणाले, "छत्रपती शिवाजी महाराज औरंगजेबाचं आणि इंग्रजांचं नाक कापायला सुरतला गेले होते. भरत गोगावलेंनी कुणाचं नाक कापलं? छत्रपती शिवाजी महाराज मर्दासारखे सुरतला गेले होते. गोगावले गद्दारी करून गेले." "छत्रपती शिवाजी महाराजांबरोबर तुलना करण्याएवढे गोगावले मोठं आहेत का?





### गोगावलेंनी कुणाचं नाक कापलं?

» वकील देवदत्त कामत यांनी 'तुम्ही सुरतला कशासाठी गेला होता?' असा प्रश्न भरत गोगावलेंना विचारण्यात आला. त्यावर "छत्रपती शिवाजी महाराज सुरतला गेले होते, म्हणून मी गेलो होतो," असं उत्तर दिलं गोगावलेंनी दिलं. गोगावलेंच्या वक्तव्यावर बोलताना अंबादास दानवे म्हणाले, "छत्रपती शिवाजी महाराज औरंगजेबाचं आणि इंग्रजांचं नाक कापायला सुरतला गेले होते. भरत गोगावलेंनी कुणाचं नाक कापलं? छत्रपती शिवाजी महाराज मर्दासारखे सुरतला गेले होते. गोगावले गद्दारी करून गेले."

हे सगळे सुर्याजी पिसाळ, खंडोजी खोपडे आहेत. शिवाजी महाराजांच्या नखाएवढी तुमची बरोबरी होऊ शकत नाही. तेवढी तुमची लायकीही नाही. हा छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान यांनी केला आहे. हे स्वराज्य विकणारे गद्दार आहेत," अशी टीका अंबादास दानवेंनी गोगावलेंवर केली आहे.

# शिंदे गट भाजपाच्या चिन्हावर लढवणार?

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

आगामी लोकसभा निवडणुकीत शिंदे गटाचे सर्व खासदार भारतीय जनता पक्षाच्या चिन्हावर निवडणूक लढवणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनीही याबाबत सूचक विधान केलं होतं. यावर आता विविध तर्क वितर्क लढवले जात आहेत.

यावर शिंदे गटाचे आमदार संजय शिरसाट यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. शिंदे गटाचे खासदार भाजपाच्या चिन्हावर निवडणूक लढवणार नाहीत. संबंधित माहिती चुकीची आहे, असं विधान शिरसाट यांनी केलं ते प्रसारमाध्यमांशी बोलत होते. शिंदे गटाचे खासदार भाजपाच्या चिन्हावर निवडणूक लढणार असल्याच्या चर्चेबाबत विचारलं असता संजय शिरसाट म्हणाले, "तुम्ही तुमचा स्त्रोत कुठून आणला? हे मला माहीत नाही. पण कमळाच्या चिन्हावर शिवसेनेचे खासदार निवडणूक लढणार, अशी जी बातमी चालू आहे, ती मुळात चुकीची आहे. प्रसारमाध्यमंही सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार बातम्या चालवतात आणि भुंकणाऱ्यांना भुंकायला संधी मिळते.

मग ते भुंकायला सुरुवात करतात. मग त्यांना निष्ठा येते. त्यांना सगळं आठवतं." संजय शिरसाटांनी पुढे नमूद केलं, "मुळात शिवसेनाप्रमुखांनी आम्हाला लढायला शिकवलं आहे. रडायला शिकवलं नाही. त्यामुळे आमचे सर्व खासदार हे शिवसेनेच्या धनुष्यबाण या चिन्हावरच निवडणूक लढणार आहेत. यात काही शंका नाही. आम्ही भाजपाबरोबरची २५ वर्षांची युती पुन्हा सुरू केली."

# संसद भवनाच्या सुरक्षेत हलगर्जीपणा!

## घुसखोरीनंतर विधानभवनातील सुरक्षा कडक

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**लोकसभेतील घुसखोरीची घटना घडल्यावर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस (DEVENDRA FADANVIS) यांनी तातडीनं पोलीस महासंचालकांना फोन केला आहे. या घटनेतील आरोपी महाराष्ट्रातील असल्यानं त्यांची लवकरात लवकर माहिती घ्या असे निर्देश फडणवीसांनी दिले. तसेच लोकसभेतील घटनेनंतर विधिमंडळ सचिवांनी सुरक्षेचा आढावा घेतला असून विधिमंडळ परिसरातील सुरक्षा कडक करण्याचे सचिवांनी आदेश दिले आहेत.**



संसदेच्या हिवाळी अधिवेशनाला सुरूवात झाली असून त्यावेळी सुरक्षेसंबंधित दोन घटना घडल्या आहेत. एका घटनेमध्ये दोन युवकांनी संसदेच्या परिसरात स्मोक कँडल पेटवण्याचा प्रयत्न केला. तर दुसऱ्या घटनेमध्ये दोन तरूणांनी प्रेक्षक गॅलरीतून संदसेद उतरण्याचा प्रयत्न केला. दोन्ही घटनेतील तरुणांनी केंद्र सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. यापैकी एका घटनेतील तरूण अमोल शिंदे हा महाराष्ट्रातील असल्याचं समोर आलं आहे. संसदेत घडलेल्या या प्रकारानंतर आता खबरदारीचा उपाय म्हणून राज्याच्या विधान भवन परिसरातील सुरक्षेचा आढावा घेण्यात आला. विधानसभा अध्यक्ष आणि विधान परिषद उपसभापती यांनी देखील विधिमंडळ परिसरातील सुरक्षेबाबत विधीमंडळ सचिवांकडून माहिती घेतली. तसेच गृहमंत्री देवेंद्र फडणवीसांनी पोलीस महासंचालकांना यासंबंधित निर्देश दिले आहेत. संसदेत झालेल्या घटनेचे पडसाद हे राज्याच्या अधिवेशनातही उमटल्याचं दिसून आलं. यावर चर्चा करताना राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे नेते पृथ्वीराज चव्हाण म्हणाले की, या प्रकरणातील अमोल शिंदे नावाचा मुलगा महाराष्ट्रातील आहे. त्यामुळे हे आंदोलन मराठा आरक्षण संदर्भात आहे का याची माहिती घेतली पाहिजे. संसदेत झालेल्या घटनेनंतर विधानभवनाच्या सुरक्षेसंदर्भात सुद्धा पाऊले उचलली गेली पाहिजेत. ज्यांनी घोषणाबाजी केली किंवा जे संसदेत घुसले ते कुठल्या संघटनेचे होते हे सुद्धा पहावे लागेल. त्यांचं म्हणणं समजून घ्यावे लागेल आणि जर ते मराठवाड्यातील किंवा महाराष्ट्रातील असतील तर इथे सुद्धा अशा प्रकार घडू शकतो. त्यामुळे विधानसभा अध्यक्षांनीसुद्धा तशा प्रकारच्या सूचना दिले आहेत आणि कमीत कमी दोन पासेस विधानभवन परिसरात येताना प्रत्येक सदस्याच्या सोबत दिली जातील. संसदेचे हिवाळी अधिवेशन सुरू असून आज लोकसभा सभागृहात मोठा गोंधळ पाहायला मिळाला. लोकसभेचे कामकाज सुरू असताना दोन अज्ञात इसमांनी प्रेक्षक गॅलरीतून सभागृहात उड्या घेतल्या. खासदारांच्या बाकांवरून उड्या मारत दोन व्यक्ती लोकसभा अध्यक्षांच्या खुर्चीच्या दिशेने धावत होते. यावेळी त्यांच्या हातात दोन कॅन होते, ज्यातून पिवळा धूर निघत होता. खासदारांनीच या दोघांना पकडण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. पण हा धूर जर विषारी असता तर मोठा अनर्थ घडला असता, अशी प्रतिक्रिया खासदारांनी दिली आहे. तसेच संसदेची नवी इमारत सुरक्षेच्यादृष्टीने इतकी कमकुवत कशी? असाही प्रश्न विरोधी खासदारांनी उपस्थित केला आहे. दरम्यान, पिठासीन राजेंद्र अग्रवाल यांनी लोकसभा दोन वाजेपर्यंत स्थगित केली आहे. काँग्रेसचे लोकसभा नेते खासदार अधीर रंजन चौधरी यांनीही सभागृहात घडलेला प्रसंग कथन केला. ते म्हणाले, “दोन लोक प्रेक्षक गॅलरीतून संसदेत उतरले. त्यांच्या हातात दोन कॅन होते, त्यातून धूर निघत होता. आम्ही खासदारांनीच मिळून दोघांनाही पकडले. त्यानंतर सुरक्षा रक्षक आतमध्ये धावत आले. आज सकाळीच आम्ही २००१ च्या हल्लाचे स्मरण करून शहीदांना अभिवादन केले. आज नव्या संसद भवनातही हल्ला झाला. त्यामुळे सुरक्षेत हलगर्जीपणा झाला, हे सत्य आहे.”

### तो धूर विषारी असता तर...

कार्ती चिदंबरम यांनी सभागृहात घडलेला प्रसंग कथन केला. ते म्हणाले, “दोन लोकांनी प्रेक्षक गॅलरीतून लोकसभा सभागृहात उडी मारली. त्यांच्या हातात कॅन होते. त्यातून पिवळा धूर येत होता. दोघांपैकी एक जण अध्यक्षांच्या आसनापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करत होता. दोघेही काहीतरी घोषणा देत होते. कदाचित हा धूर विषारीही असला असता किंवा स्मोक बॉम्बही असू शकला असता. आजच्या दिवशीच १३ डिसेंबर २००१ रोजी संसदेवर हल्ला झाला होता. त्यामुळे याच दिवशी पुन्हा अशाप्रकारे घुसखोरी होणे, हे खूपच गंभीर आहे.”

# मोहन यादव मुख्यमंत्रिपदी विराजमान!

## शपथविधीला महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळाची हजेरी

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**आता मध्य प्रदेशात (MADHYA PRADESH) 'मोहन'राज! मोहन यादव (MOHAN YADAV) यांनी मध्य प्रदेशचे (MADHYA PRADESH NEWS) नवे मुख्यमंत्री (CHIEF MINISTER) म्हणून शपथ घेतली आहे. मध्य प्रदेशची राजधानी भोपाळ येथील परेड ग्राउंडवर सकाळी 11.30 वाजता मोहन यादव यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. त्यांच्यासोबत राजेंद्र शुक्ला आणि जगदीश देवरा यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली.**



या सोहळ्याचा केंद्र सरकारमधील नेत्यांनी मांदियाळी पाहायला मिळाली. या शपथविधी सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी (PM NARENDRA MODI) , केंद्रीय गृहमंत्री (UNION HOME MINISTER) अमित शाह (AMIT SHAH), भाजप अध्यक्ष (BJP PRESIDENT) जे.पी. नड्डा (JP NADDA) यांची प्रमुख उपस्थिती पाहायला मिळाली. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही या सोहळ्याला उपस्थिती लावली. मोहन यादव मध्य प्रदेशचे नवे मुख्यमंत्री झाले आहेत. खासदार राज्यपाल मंगूभाई छगनभाई पटेल यांनी उज्जैन दक्षिणचे आमदार मोहन यादव यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. मुख्यमंत्री मोहन यादव यांच्यासोबत जगदीश देवरा आणि राजेंद्र शुक्ला यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. भोपाळमध्ये हा भव्य सोहळा आयोजित करण्यात आला होता. या शानदार सोहळ्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह, भाजप अध्यक्ष जेपी नेड्डा उपस्थित होते. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस (DEVENDRA FADNAVIS), अजित पवार (AJIT PAWAR) यांनीही या सोहळ्याला हजेरी लावली. याशिवाय उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ (UP CM YOGI ADITYANATH), उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, ज्योतिरादित्य सिंधिया यांच्यासह भाजपचे अनेक नेते यावेळी उपस्थित होते.

# पुढील 48 तासात पावसाची शक्यता!

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

देशात बहुतेक राज्यांमध्ये तापमानात घट झाल्याचं दिसून येत आहे. मिचॉन्ग चक्रीवादळाचा प्रभाव कमी झाला असला तरी, वेस्टर्न डिस्टर्बन्समुळे आजही पावसाची शक्यता आहे. देशात 13 ते 16 डिसेंबर दरम्यान पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. ईशान्य भारत आणि दक्षिण भारतात पावसाची शक्यता आहे. पर्वतीय भागात जोरदार बर्फवृष्टी सुरु आहे. तामिळनाडू आसामसह काही भागात आज पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार, येत्या दोन दिवसांत केरळ आणि माहेमध्ये हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. आयएमडीच्या अंदाजानुसार, दिल्लीच्या तापमानात आणखी घट होईल आणि सकाळी धुके पडण्याची शक्यता आहे. उत्तर भारतात थंडीची लाट आली आहे. उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्यांमुळे तापमानात आणखी घट होणार आहे. कोकण, मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी ढगाळ वातावरण पाहायला मिळणार आहे. अरुणाचल प्रदेश, आसाम आणि मेघालयमध्ये पावसाची शक्यता आहे. यासोबतच आसाम, मेघालय, नागालँड, मणिपूर, मिझोराम आणि त्रिपुरामध्ये 13 आणि 14 डिसेंबरला दाट धुके पडण्याची शक्यता आहे. या राज्यांव्यतिरिक्त पंजाब, उत्तर प्रदेश आणि हरियाणामध्येही धुके पडण्याची शक्यता आहे.

# शाहरुखचा 'डंकी' पाहून तुमचे डोळे पाणावतील

अभिनेता शाहरुख खानसाठी (SHAH RUKH KHAN) 2023 हे वर्ष खास ठरले. किंग खानचा यावर्षी रिलीज झालेला 'पठाण' (PATHAAN) हा चित्रपट ब्लॉकबस्टर ठरला तर त्याच्या 'जवान' (JAWAN) या चित्रपटानं बॉक्स ऑफिसवर रेकॉर्ड ब्रेक कमाई केली. आता 2023 हे वर्ष संपत आले आहे, अशातच शाहरुख हा त्याच्या चाहत्यांच्या 2023 या वर्षाचा शेवट मनोरंजनानं करणार आहे. त्याचा डंकी (DUNKI) हा चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. आता या चित्रपटाचा पहिला रिव्ह्यू मूव्ही हब नवाच्या एका ट्विटर अकाऊंटवरुन शेअर करण्यात आला आहे. जाणून घेऊयात डंकी चित्रपटाच्या पहिल्या रिव्ह्यूबाबत... मूव्ही हब नवाच्या ट्विटर अकाऊंटवरुन डंकी या चित्रपटाचा पहिला रिव्ह्यू शेअर करण्यात आला आहे. यामध्ये लिहिलं आहे, डंकी हा चित्रपट राजकुमार हिरानी यांच्या स्टोरी टेलिंगचा उत्कृष्ट नमुना आहे, असा चित्रपट भारतीय चित्रपटसृष्टीने यापूर्वी कधीही पाहिला नसेल. शाहरुख खानने या चित्रपटात सर्वोत्तम अभिनय केला आहे.चित्रपटाचा पहिला भाग म्हणजे डंकीचा भारत ते लंडनचा प्रवास. हा भाग तुम्हाला पात्र, कथा, कॉमेडी, रोमान्स, प्रेम आणि मैत्री यांच्याशी जोडतो." "चित्रपटाच्या दुसरा भागात चित्रपटाची मुख्य कथा मांडण्यात आली आहे.जी पाहताना तुमचे डोळे पाणावतील.भारतीय चित्रपटसृष्टीत हा ऐतिहासिक सिनेमा ठरणार आहे.", असंही या रिव्ह्यूमध्ये लिहिण्यात आलं आहे. डंकी चित्रपटाच्या या रिव्ह्यूच्या सत्यतेबद्दल नेटकऱ्यांनी विचारल्यानंतर मूव्ही हब पोर्टलने उत्तर दिले, 'भारतातील डिस्ट्रिब्यूटर्ससाठी 2 दिवसांपूर्वी या चित्रपटाच्या स्क्रीनिंगचे आयोजन करण्यात आले होते. हा रिपोर्ट त्यापैकी एका मोठ्या वितरकाचा आहे." या रिव्ह्यूमध्ये डंकी या चित्रपटाला पाच स्टार्स देण्यात आले आहेत. शाहरुख खानच्या डंकी या चित्रपटाची प्रेक्षक उत्सुकतेने वाट बघत आहेत. या चित्रपटात शाहरुख व्यतिरिक्त तापसी पन्नू, विकी कौशल आणि अभिनेता बोमन इराणी या कलाकारांनी प्रमुख भूमिका साकारली आहे. हा चित्रपट 21 डिसेंबर 2023 रोजी थिएटरमध्ये रिलीज होणार आहे.

# ऐश्वर्याच्या ब्रेकअपचं खरं कारण काय?



विवेक ओबेरॉय (VIVEK OBEROI) आणि ऐश्वर्या राय हे दोघेही बॉलिवूडचे लोकप्रिय सेलिब्रिटी आहेत. विवेक हा बॉलिवूडचा चार्मिंग बॉय आहे. त्याच्या लूक्सचं नेहमीच कौतुक होत असतं. सिनेमांमुळे तो चर्चेत असतो. पण सिनेमांपेक्षा वैयक्तिक आयुष्यामुळे तो जास्त चर्चेत असतो. आता नुकत्याच एका मुलाखतीत त्याने ऐश्वर्या रायबद्दल (AISHWARYA RAI) भाष्य करत त्यांच्या ब्रेकअपचाही खुलासा केला आहे. विवेक ओबेरॉय आणि ऐश्वर्या राय यांच्या अफेअरची चांगलीच चर्चा रंगली होती. सध्या दोघेही आपापल्या आयुष्यात आनंदी आहेत. काही दिवसांपूर्वी विवेकने ऐश्वर्या आणि त्याच्या रिलेशनबद्दल मोठं वक्तव्य केलं होतं. बॉलिवूडचा भाईजान सलमान खानसोबत (SALMAN KHAN) ब्रेकअप झाल्यानंतर ऐश्वर्याच्या आयुष्यात विवेक आला होता. इंडस्ट्रीतील सुखी जोडपं म्हणून त्यांच्याकडे पाहिलं जात होतं. अनेकदा दोघांना एकत्र स्पॉट करण्यात आलं आहे. पण त्यांचं नातं वादाच्या भोवऱ्यातही अडकलं होतं. विवेक ओबेरॉयने आरोप लावला होता की, ऐश्वर्यासोबत नातं तोडण्यासाठी त्याला धमक्या मिळत होत्या. नुकत्याच एका मुलाखतीत याबद्दल भाष्य करत अभिनेता म्हणाला,"कमिटमेंट आणि जबाबदारी झटकण्याची सवय मला नाही..पण मला सर्वांनीच धोका दिला आहे. लोकांनी वचन दिलं. पण ते पूर्ण करण्याचा त्यांनी कधी प्रयत्नच केला नाही". विवेक ओबेरॉय पुढे म्हणाला,"माझ्या अनेक गर्लफ्रेंड माझ्या लग्नातही उपस्थित होत्या. ऐश्वर्यासोबतचं नातं तुटल्यानंतर विवेकची जखम भरलेली नाही, अशी शक्यता चाहत्यांकडून वर्तवली जात आहे. सलमानसोबत ब्रेकअप झाल्यानंतर ऐश्वर्या राय विवेक ओबेरॉयला डेट करू लागली. 'क्यों हो गया ना' या सिनेमाच्या सेटवर ऐश्वर्या आणि विवेक यांची पहिली भेट झाली होती. या सिनेमाच्या शूटिंगदरम्यान ऐश्वर्या आणि विवेकमध्ये चांगली मैत्री झाली. पुढे या मैत्रीचं रुपांतर प्रेमात झालं.

# रामाच्या भूमिकेत झळकणार रणबीर

बॉलिवूड अभिनेता रणबीर कपूरचा (RANBIR KAPOOR) 'ॲनिमल' (ANIMAL) हा सिनेमा बॉक्स ऑफिसवर धमाकेदार कामगिरी करत आहे. या बहुचर्चित सिनेमामुळे सध्या तो चर्चेत आहे. 'ॲनिमल' या सिनेमानंतर रणबीर आता 'रामायण'च्या शूटिंगला सुरुवात करणार आहे. या सिनेमात तो रामाच्या भूमिकेत दिसणार आहे. रणबीर कपूरचं (RANBIR KAPOOR) नाव काही महिन्यांपूर्वी नितेश तिवारी आणि मधु मंतेना यांच्या आगामी 'रामायण' या सिनेमासोबत जोडलं गेलं आहे. या सिनेमासंदर्भात नव-नवे अपडेट्स समोर येत आहेत. दाक्षिणात्य मनोरंजनसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री साई पल्लवी (SAI PALLAVI) 'रामायण' या सिनेमाच्या माध्यमातून बॉलिवूडमध्ये पदार्पण करणार आहे. तसेच 'केजीएफ' फेम यशदेखील या सिनेमात महत्त्वाच्या भूमिकेत असणार आहे.

# तृप्तीचा रोमँटिक अंदाज



काही दिवसांपूर्वी रिलीज झालेल्या ॲनिलम (ANIMAL) या चित्रपटानं बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातला आहे. या चित्रपटामधील अभिनेता रणबीर कपूर आणि बॉबी देओल या दोघांच्या अभिनयाचं अनेकजण कौतुक करत आहेत, अशातच रणबीर आणि तृप्ती डिमरी (TRIPTI DIMRI) यांच्या ॲनिमल चित्रपटातील इंटिमेट सीन्सनं देखील अनेकांचे लक्ष वेधले आहे. ॲनिमल या चित्रपटामुळे तृप्ती ही भाभी-2 आणि झोया या नावांनी ओळखली जात आहे. तृप्ती ही सध्या ॲनिमल चित्रपटासोबतच सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या काही फोटोंमुळे देखील चर्चेत आहे. या फोटोमध्ये तृप्ती आणि अभिनेता विकी कौशलचा रोमँटिक अंदाज प्रेक्षकांना बघायला मिळत आहे. विकी कौशल आणि तृप्ती डिमरी लवकरच मेरे महबूब मेरे सनम या रोमँटिक-कॉमेडी चित्रपटामध्ये स्क्रीन शेअर करणार आहेत. या चित्रपटाचे दिग्दर्शन बंदिश बँडिट्स फेम दिग्दर्शक आनंद तिवारी हे करणार आहेत. गेल्या वर्षी तृप्ती आणि विकी यांनी क्रोएशियामध्ये एक रोमँटिक गाणे शूट केले होते. या गाण्याच्या सेटवरील काही फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. या फोटोमध्ये विकी आणि तृप्तीचा रोमँटिक अंदाज प्रेक्षकांना बघायला मिळत आहे. मेरे महबूब मेरे सनम हा विकी आणि तृप्तीचा चित्रपट 2024 मध्ये फेब्रुवारी महिन्यात रिलीज होणार आहे, असं म्हटलं जात आहे. या चित्रपटामधील गाण्याचे डायरेक्शन फराह खाननं केली आहे. ॲनिमल चित्रपटामधील तृप्ती आणि रणबीरच्या इंटिमेट सीनची सध्या सोशल मीडियावर चर्चा होत आहे. या सीनबाबत तृप्तीनं एका मुलाखतीमध्ये सांगितलं," इंटिमेट सीन जेव्हा शूट केला जात होता तेव्हा सेटवर फक्त चार-पाच लोक होते.

# 'द आर्चीज' रिलीज होताच खुशी कपूरला मिळाला दुसरा सिनेमा

सिनेनिर्माते बोनी कपूर (BONEY KAPOOR) यांची लेक खुशी कपूरने दिग्दर्शक जोया अख्तर (ZOYA AKHTAR) यांच्या 'द आर्चीज' (THE ARCHIES) या सिनेमाच्या माध्यमातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केलं आहे. 'द आर्चीज' या सिनेमानंतर खुशी कपूर लवकरच एका सिनेमात झळकणार आहे. करण जोहर (KARAN JOHAR) या सिनेमाची निर्मिती करणार आहे. खुशी कपूरने 'द आर्चीज' या सिनेमाच्या माध्यमातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केलं आहे. 7 डिसेंबर 2023 रोजी हा सिनेमा ओटीटी प्लॅटफॉर्मवर रिलीज झाला आहे. पहिला सिनेमा रिलीज झाल्या झाल्या खुशीला आता दुसरा सिनेमाही मिळाला आहे. करण जोहर या सिनेमाच्या निर्मितीची धुरा सांभाळणार आहे. या सिनेमात सैफ अली खानचा (SAIF ALI KHAN) मुलगा इब्राहिम अली खानसोबत (IBRAHIM ALI KHAN) स्क्रीन शेअर करताना खुशी दिसेल. पिंकव्हिलाच्या





रिपोर्टनुसार, करण जोहर एक रोमँटिक सिनेमा बनवण्याची तयारी करत आहेत. या सिनेमात खुशी कपूर आणि इब्राहिम अली खान मुख्य भूमिकेत झळकतील. खुशी-इब्राहिमचा हा सिनेमा ओटीटी प्लॅटफॉर्मवर रिलीज होईल. या सिनेमाच्या स्ट्रीमिंग राइटसाठी निर्माते ओटीटी प्लॅटफॉर्मसोबत बोलत आहेत. खुशी कपूर आणि इब्राहिम अली खानच्या या सिनेमाच्या दिग्दर्शनाची धुरा शौना गौतम सांभाळणार आहे. लवकरच या सिनेमाच्या शूटिंगला सुरुवात होईल. अद्याप सिनेमाचं नाव समोर आलेलं नाही. शौना गौतमने 'रॉकी और रानी की प्रेम कहानी' (ROCKY AUR RANI KI PREM KAHANI) आणि 'संजू' (SANJU) या सिनेमांचं सहाय्यक दिग्दर्शन केलं आहे. तर खुशी कपूरने 'द आर्चीज' या सिनेमाच्या माध्यमातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केलं आहे. इब्राहिम अली खान 'सरजमीं' या सिनेमाच्या माध्यमातून बॉलिवूडमध्ये पदार्पण करणार आहे. करण जोहरच्या धर्मा प्रोडक्शन अंतर्गत या सिनेमाची निर्मिती होणार आहे. खुशी कपूर आणि इब्राहिम अली खान यांचा हा दुसरा सिनेमा आहे. आता खुशी आणि इब्राहिमच्या सिनेमाची चाहत्यांना उत्सुकता आहे.

# प्रसिद्धची आफ्रिकेविरुद्ध हॅट्रीक!

## » प्रथम श्रेणीमध्ये हॅट्ट्रिक घेणारा सहावा भारतीय

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**भारताचा वेगवान गोलंदाज प्रसिद्ध कृष्णाने भारत 'अ' संघाकडून खेळताना द. आफ्रिका 'अ' संघाची कंबर मोडली. ब्लोमफॉन्टेन येथील मॅनगाँग ओव्हल मैदानावर खेळल्या जात असलेल्या पहिल्या अनौपचारिक कसोटी सामन्यात कृष्णाने हॅट्रिकसह पाच बळी घेतले. यासह तो भारताबाहेर प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये हॅट्रिक घेणारा सहावा भारतीय गोलंदाज ठरला आहे. तर भारत 'अ' संघाकडून खेळताना प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये हॅट्रिक घेणारा तो हा दुसरा गोलंदाज आहे. त्याच्या आधी गौतमने 2019 मध्ये अशी कामगिरी केली होती.**



प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या द. आफ्रिका 'अ' संघाने पहिल्या डावात 319 धावा केल्या. एकेकाळी आफ्रिकन संघ चांगल्या स्थितीत होता. संघाची धावसंख्या 3 बाद 215 होती. कृष्णाला सामन्याच्या पहिल्या दिवशी एकही विकेट घेता आली नव्हती.

पण दुस-या दिवशी त्याने अचूक मारा केला आणि यजमान संघाच्या फलंदाजीला खिंडार पाडले. या सामन्यात भारतीय संघाचे पुनरागमन करण्यात मोलाचे योगदान दिले. द. आफ्रिका 'अ' संघासाठी जीन डु प्लेसिसने 106 आणि रुबिन हरमनने 95 धावा केल्या. इंडिया 'अ' संघासाठी कृष्णाने 2.36 च्या इकॉनॉमीसह 18.1 षटकात 43 धावा देत 5 बळी घेतले.

उजव्या हाताचा वेगवान गोलंदाज प्रसिद्ध कृष्णाने जीन डू प्लेसिसला 106 धावांवर बाद केले. 95व्या षटकाच्या पुढच्या चेंडूवर इथन बॉश बाद झाला. यानंतर कृष्णाने त्याच्या पुढच्या षटकातील शेवटच्या दोन चेंडूंवर कर्टलिन मॅनिकम आणि सिया प्लातजे यांना क्लीन बोल्ड केले. कृष्णाने 11व्या क्रमांकाचा फलंदाज ओडिरिले मोदीमोकोआनेला गोल्डन डकवर बाद करून हॅट्रिक पूर्ण केली. त्याने तिन्ही फलंदाजांच्या दांड्या गुल केल्या. 27 वर्षीय कृष्णाने आपल्या प्रथम श्रेणी कारकिर्दीत 22 डावात 54 विकेट्स घेतल्या आहेत. यात त्याने तीन वेळा पाच विकेट घेण्याची किमया केली आहे. त्याची द. आफ्रिकेविरुद्धच्या कसोटी मालिकेसाठी निवड झाली आहे. मात्र, जसप्रीत बुमराह, मोहम्मद शमी आणि मोहम्मद सिराज यांच्या उपस्थितीमुळे त्याला खेळण्याची संधी मिळेल की नाही याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

भारताबाहेर प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये हॅट्रिक घेतलेल्या इतर गोलंदाजांमध्ये सीके नायडू, कमांडर रंगाचारी, रमेश दिवेचा, इरफान पठाण आणि जसप्रीत बुमराह यांचा समावेश आहे. नायडू यांनी मार्च 1946 मध्ये केन्सिंग्टन येथे सरे विरुद्ध हॅट्रिक घेतली होती. रंगाचारी यांनी जानेवारी 1948 मध्ये हावर्ट येथे टास्मानिया विरुद्ध हॅट्रिक घेतली आणि दिवेचा यांनी जानेवारी 1952 मध्ये केन्सिंग्टन येथे सरे विरुद्ध हॅट्रिक घेतली. याशिवाय इरफानने कराचीमध्ये पाकिस्तानविरुद्ध तर बुमराहने वेस्ट इंडिजविरुद्ध किंग्स्टनमध्ये हॅट्रिक विकेट घेतली होती.

### कसोटी मालिकेसाठी कृष्णाची निवड

» भारताचा वेगवान गोलंदाज प्रसिद्ध कृष्णाने भारत 'अ' संघाकडून खेळताना द. आफ्रिका 'अ' संघाची कंबर मोडली. 27 वर्षीय कृष्णाने आपल्या प्रथम श्रेणी कारकिर्दीत 22 डावात 54 विकेट्स घेतल्या आहेत. यात त्याने तीन वेळा पाच विकेट घेण्याची किमया केली आहे. त्याची द. आफ्रिकेविरुद्धच्या कसोटी मालिकेसाठी निवड झाली आहे. मात्र, जसप्रीत बुमराह, मोहम्मद शमी आणि मोहम्मद सिराज यांच्या उपस्थितीमुळे त्याला खेळण्याची संधी मिळेल की नाही याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

# रिंकूची आयसीसी टी-२० क्रमवारीत ४६ स्थानांची मोठी झेप

## » रिंकू सिंगने आपल्या छोट्या कारकिर्दीत चमकदार कामगिरी केली

।नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**टीम इंडियाचे स्टार फलंदाज सूर्यकुमार यादव आणि रिंकू सिंग यांना दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या दुसऱ्या टी-२० सामन्यात अर्धशतक झळकावल्यानंतर फायदा झाला आहे. सूर्यकुमार आयसीसी टी-२० क्रमवारीत अव्वल स्थानावर कायम आहे. त्याचे रेटिंग पॉइंट आणखी वाढले आहेत. त्याचबरोबर रिंकूने ४६ स्थानांची मोठी झेप घेतली आहे. सूर्यकुमारने केवळ ३६ चेंडूत ५६ धावांची खेळी केली. यामुळे त्याला १० रेटिंग पॉइंट मिळाले. त्याचे एकूण ८६५ रेटिंग पॉइंट आहेत.**



सूर्यकुमार यादवशिवाय ऋतुराज गायकवाड भारतातून पहिल्या दहामध्ये सातव्या स्थानावर आहे. दक्षिण आफ्रिकेसाठी, टॉप १० मध्ये, रीझा हेंड्रिक्सला एका स्थानाचा फायदा झाला आहे आणि तो आठव्या स्थानावर आहे. यशस्वी जैस्वाल १० स्थानांचा फटका बसला असून आता २९ व्या स्थानावर आहे. रिंकू सिंगला ४६ स्थानांचा मोठा फायदा झाला आहे आणि तो आता टॉप १०० मध्ये ५९ व्या स्थानावर आहे, तर तिलक वर्मा १० स्थानांच्या वाढीसह ५५ व्या स्थानावर आहे. रवी बिश्नोई गोलंदाजी क्रमवारीत पहिल्या स्थानावर कायम आहे, तसेच दक्षिण आफ्रिकेचा तबरेझ शम्सी दोन स्थानांनी १० व्या स्थानावर पोहोचला आहे. टॉप १० च्या बाहेर कुलदीप यादव पाच स्थानांच्या फायद्यासह ३२ व्या स्थानावर आहे.

अष्टपैलू खेळाडूंच्या क्रमवारीत एडन मार्करामने दोन स्थानांनी प्रगती केली आहे. रिंकू सिंगच्या चमकदार कामगिरीचा अंदाज यावरून लावता येतो की, तो सातपैकी केवळ एका डावात अपयशी ठरला आहे. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या शेवटच्या टी-२० मध्ये तो सहा धावा करून बाद झाला होता. तो चार डावात नाबाद राहिला आहे. दक्षिण आफ्रिकेविरुद्धचे अर्धशतक हे त्याच्या टी-२० कारकिर्दीतील पहिले अर्धशतक ठरले. त्याने सात डावात १८३.७० च्या स्ट्राईक रेटने २४८ धावा केल्या आहेत. भारताने पाच वर्षांनंतर दक्षिण आफ्रिकेविरुद्ध त्यांच्या घरच्या मैदानावर टी-२० सामना गमावला आहे. टीम इंडियाचा शेवटचा पराभव २०१८ मध्ये सेंच्युरियनच्या मैदानावर झाला होता. भारताविरुद्धचा हा सामना जिंकून दक्षिण आफ्रिकेने मालिकेत १-० अशी अभेद्य आघाडी घेतली. या मालिकेतील तिसरा आणि शेवटचा सामना १४ डिसेंबरला होणार आहे. त्या सामन्यात टीम इंडियाचा पराभव झाला, तर मालिका हातातून जाईल. २०१२ मध्ये दक्षिण आफ्रिकेत भारताने शेवटची टी-२० मालिका गमावली होती. त्यानंतर २०१८ मध्ये भारताने २-१ असा विजय मिळवला होता. टीम इंडियाचे स्टार फलंदाज सूर्यकुमार यादव आणि रिंकू सिंग यांना दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या दुसऱ्या टी-२० सामन्यात अर्धशतक झळकावल्यानंतर फायदा झाला आहे.

### सात डावात फक्त एकदाच अपयशी

» रवी बिश्नोई गोलंदाजी क्रमवारीत पहिल्या स्थानावर कायम आहे, तसेच दक्षिण आफ्रिकेचा तबरेझ शम्सी दोन स्थानांनी १० व्या स्थानावर पोहोचला आहे. टॉप १० च्या बाहेर कुलदीप यादव पाच स्थानांच्या फायद्यासह ३२ व्या स्थानावर आहे. अष्टपैलू खेळाडूंच्या क्रमवारीत एडन मार्करामने दोन स्थानांनी प्रगती केली आहे. रिंकू सिंगच्या चमकदार कामगिरीचा अंदाज यावरून लावता येतो की, तो सातपैकी केवळ एका डावात अपयशी ठरला आहे. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या शेवटच्या टी-२० मध्ये तो सहा धावा करून बाद झाला होता. तो चार डावात नाबाद राहिला आहे. दक्षिण आफ्रिकेविरुद्धचे अर्धशतक हे त्याच्या टी-२० कारकिर्दीतील पहिले अर्धशतक ठरले.